# ९. सहकारी गृहनिर्माण संस्था

(Housing Co-operative Society)

| | |
|---|---|
| ९.१ प्रस्तावना | ९.५ सारांश |
| ९.२ अर्थ व व्याख्या | ९.६ महत्त्वाच्या संज्ञा |
| ९.३ वैशिष्ट्ये | ९.७ स्वाध्याय |
| ९.४ कार्ये | |



सहकारी गृहनिर्माण संस्था

## ९.१ प्रस्तावना : (Introduction)

औद्योगीकरणामुळे शहरीकरण, नागरीकरण होत आहे. त्याचबरोबर वाढत्या लोकसंख्येमुळे मोठ्या प्रमाणावर निवाऱ्याची गरज निर्माण झाली आहे. प्रामुख्याने शहरी भागात वाढत्या लोकसंख्येच्या केंद्रीकरणामुळे घरांच्या मागणी पुरवठ्यात असमतोल, जागा व बांधकाम साहित्याच्या वाढत्या किंमती, विभक्त कुटुंब पद्धती यामुळे घरांच्या किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्यामुळे अल्प व मध्यम उत्पन्न गटातील व्यक्तिंना स्वतःच्या वैयक्तिक उत्पन्नाच्या माध्यमातून घर बांधणे शक्य होत नाही. यातून घर बांधणीची समस्या निर्माण झाली आहे.

घर बांधण्याच्या सामायिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी अनेक व्यक्ति एकत्रित येऊन गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या माध्यमातून आपला प्रश्न सोडवू शकतात. बँका आणि वित्तीय संस्था यांच्याकडून कर्जे घेणे,जागेची खरेदी, बांधकाम आणि त्यानंतर संस्थेच्या बांधकामाची दुरुस्ती व देखभाल हे सर्व व्यवहार सहकारी संस्थेच्या माध्यमातून केल्यास सर्वसामान्य व्यक्तिला योग्य व कमी खर्चात आपले घर किंवा निवाऱ्यासंबंधीचा प्रश्न सोडविता येतो. घर घेण्याच्या समस्येवर सहकारी गृहनिर्माण संस्था हा खात्रीशीर उपाय आहे. भारतात इ.स. १९०९ मध्ये म्हैसूर प्रांतात 'बेंगलोर को-ऑप. सोसायटी लिमिटेड' ही पहिली गृहनिर्माण सहकारी संस्था स्थापन झाली. नियोजन काळात गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या विकासाला वेग आला.

'भारतीय राष्ट्रीय सहकारी गृहनिर्माण महासंघ' (National Co-operative Housing Federation of India) ही राष्ट्रीय शिखर संस्था देशातील एकूण सहकारी गृहनिर्माण चळवळीला दिशा देण्याचे कार्य करते.तिची स्थापना सप्टेंबर १९६९ मध्ये झाली. एप्रिल १९७० मध्ये स्थापन झालेले 'गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळ' (Housing and Urban Development Corporation-HUDCO) हे नागरी भागातील सहकारी गृहनिर्माण प्रकल्पांना कर्ज पुरवठा करते.

## ९.२ अर्थ व व्याख्या : Meaning and Definition

### ❑ अर्थ : Meaning

निवाऱ्याची समान गरज असणाऱ्या व्यक्ति एकत्र येऊन गृहनिर्माण सहकारी संस्थेची स्थापना करतात. घरासाठी आवश्यक असलेली जागा किंवा जमीन सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत खरेदी केली जाते किंवा सरकारकडून सवलतीच्या दरात मिळविली जाते. घरांचे आराखडे, बांधकाम साहित्य, मजुरी, दुरुस्ती, देखभाल असे सर्व व्यवहार संस्थेमार्फत केले जातात. अशा सहकारी संस्थांना गृहनिर्माण सहकारी संस्था असे म्हणतात.

### ❑ व्याख्या : Definition

"मर्यादित उत्पन्न असलेल्या व्यक्तिंनी एकत्र येऊन आपल्या राहण्यासाठीच्या घराची गरज पूर्ण करण्यासाठी सहकारी तत्वानुसार स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय."

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० नुसार "आपल्या सभासदांना राहण्यासाठी घरे किवा सदनिका बांधून देणे, तसेच सभासदांना समान सुखसोयी आणि सेवा पुरविणे या उद्देशाने सहकारी तत्वावर स्थापन झालेली संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय."

## ९.३ सहकारी गृहनिर्माण संस्थेची वैशिष्ट्ये (Features of Housing Co-operative Society) :



१) **ऐच्छिक संघटना :** मर्यादित उत्पन्न असलेल्या अल्प व मध्यम उत्पन्न गटातील व्यक्ति स्वेच्छेने एकत्र येऊन,आपल्या निवाऱ्याचा प्रश्न सोडवण्यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थेची स्थापना करतात.संस्थेचे सभासद होण्यासाठी कोणालाही सक्ती केलेली नसते. जमीन खरेदीपासून प्रत्यक्ष घरे किंवा सदनिका तयार होईपर्यंत सर्व कार्ये सभासद परस्पर सहकार्याने पूर्ण करतात. ज्या व्यक्तिंची स्वत:ची घरे नाहीत अशा व्यक्तिंना सभासद होता येते.

२) **वाजवी किंमतीमध्ये घर बांधणी :** सहकारी गृहनिर्माण संस्था मोठ्या प्रमाणात जमीन,बांधकाम साहित्य, इतर सेवा खरेदी करतात.अनावश्यक मध्यस्थ कमी होतात.त्यामुळे कमीत कमी किंमतीमध्ये सभासदांना घरे उपलब्ध होतात. सहकार तत्वानुसार घरबांधणीचे कार्य चालत असल्याने व मोठ्या खरेदीचे फायदे मिळत असल्याने येणारा खर्च कमी असतो.

३) **भांडवल उभारणी :** भागांची विक्री, सभासद प्रवेश शुल्क तसेच बँका आणि विविध वित्तीय संस्था यांच्याकडून कर्ज घेऊन भांडवल उभारणी केली जाते.भारतीय आर्युविमा महामंडळ,सार्वजनिक व व्यापारी बँका,सहकारी बँका, गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळ (HUDCO), गृहनिर्माण विकास वित्तीय महामंडळ (HDFC) इत्यादीकडून कर्ज उपलब्ध करून दिले जाते. सहकारी गृहनिर्माण संस्थेला शासन भांडवल पुरवठा करून अनुदान देते.

४) **लोकशाही व्यवस्थापन :** लोकशाही व्यवस्थापन हे सहकारचे एक मूलभूत तत्त्व आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था या तत्वानुसारच काम करतात. संस्थेचा कारभार हा सभासदांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींमार्फत चालविला जातो. वर्षातून एकदा सर्व सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा बोलविली जाते व त्या सभेमध्ये गृहनिर्माण सहकारी संस्थेबाबत महत्त्वाचे आणि धोरणात्मक निर्णय घेतले जातात.

५) **मध्यस्थांचे उच्चाटन :** घरांची बांधणी, विक्री अशा व्यवहारात अनेक मध्यस्थ व दलाल असतात. हे मध्यस्थ व दलाल ग्राहकांचे आर्थिक शोषण व फसवणूक करतात. सहकारी गृहनिर्माण संस्थांमुळे असे अनावश्यक मध्यस्थ व दलाल टाळले जातात. ही संस्था सभासदांबरोबर प्रत्यक्ष व्यवहार करते . त्यामुळे सभासदांना वाजवी किमतींमध्ये घरे मिळतात.

६) **बांधकाम, दुरुस्ती व देखभाल खर्चात बचत :** मोठ्या प्रमाणात बांधकाम साहित्याची खरेदी केल्यामुळे खर्चात बचत होते. कारण हा खर्च सर्वांसाठी सामुदायिकपणे केला जातो. ही सर्व कामे एकत्रितरित्या होत असल्याने खर्चात बचत होते.

७) **सभासदांच्या बचत सवयीमध्ये वाढ :** गृहनिर्माण सहकारी संस्था सभासदांना दीर्घ मुदतीचे कर्ज अल्प व्याजदराने उपलब्ध करून देतात.या कर्जाच्या परतफेड हप्त्यासाठी आणि दुरुस्ती देखभाल खर्चासाठी काही रक्कम दर महिन्याला संस्थेकडे जमा करावी लागते. यामधून सभासदांना बचतीची सवय लागते.

८) **समूह जीवनाचा आनंद :** सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सभासदत्व सर्वांसाठी खुले असते.सर्व सभासद भेदभाव विसरून एकत्र राहतात. त्यांच्यामध्ये सलोख्याचे सबंध निर्माण होतात. एकमेकांच्या सुखदु:खात ते सहभागी होतात यामुळे सभासदांना समूहजीवनाचा आनंद मिळतो.

९) **शहरी भागाचा विकास :** लोकसंख्येच्या केंद्रीकरणामुळे शहरात जागेची टंचाई निर्माण होते. जागेचे भाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने सर्वसामान्यांना आपल्या मर्यादित उत्पन्नातून जागा घेणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत सहकारी गृहनिर्माण संस्था या सभासदांचे घर बांधणीचे स्वप्न पूर्ण करतात.त्यामुळे शहरी भागाचा विकास होतो.

१०) **कर्ज पुरवठ्याची तरतूद :** सहकारी गृहनिर्माण संस्था आपल्या सभासदांना घरबांधणीसाठी आवश्यक असलेले कर्ज मिळविण्यास मदत करतात.बँका आणि वित्तीय संस्थांकडून कर्ज मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता करतात.उदा. जागेचे खरेदीखत, नकाशा, ७/१२ उतारा, घराची अंदाजे किंमत इ. वित्तीय संस्थांकडून कमी व्याजदराने सुलभ परतफेडीच्या हप्त्याने कर्जपुरवठा केला जात असल्याने सर्वसामान्यांचे घरबांधणीचे स्वप्न पूर्ण होते.

## ९.४ सहकारी गृहनिर्माण संस्थेची कार्ये (Functions of Housing Co-operative Society)




१) **गृहनिर्माण संस्थेसाठी जागा मिळविणे :** सध्याच्या काळात मोकळ्या जागेच्या किंमती भरमसाठ असल्याने सामान्य माणसाला घरासाठी जागा खरेदी करणे शक्य होत नाही. अशा स्थितीत सहकारी गृहनिर्माण संस्थेची स्थापना केली जाते. गृहनिर्माण संस्थेला बांधकाम करण्यासाठी जागा मिळविणे हे अत्यंत महत्त्वाचे कार्य करावे लागते. शासन किंवा अधिकृत प्राधिकरण अथवा खाजगी व्यक्तिकडून आवश्यक कायदेशीर व इतर बाबींची पूर्तता करून संस्था घरांसाठी जागा मिळविते.

२) **संस्थेच्या नोंदणीसाठी आवश्यक ती पूर्तता करणे :** सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी करण्यासाठी आवश्यक कागद पत्रे व इतर गोष्टींची पूर्तता करून जिल्हा उपनिबंधक यांचेकडे अर्ज सादर करतात संस्था नोंदणी करून नोंदणीचे प्रमाणपत्र मिळवितात. निवाऱ्याची गरज असणाऱ्या किमान दहा व्यक्ति एकत्र येऊन संस्थेची नोंदणी करू शकतात.

३) **बांधकाम परवानगी मिळविणे :** गृहनिर्माण सहकारी संस्थेची नोंदणी करणे व जागा मिळविण्याबरोबरच संस्था ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या किंवा प्राधिकरणाच्या अधिकार कक्षेमध्ये आहे, अशा सर्व संबंधीत कार्यालयाकडून बांधकाम करण्यासाठी आवश्यक त्या परवानग्या मिळवाव्या लागतात.

४) **बांधकाम व्यावसायिकांबरोबर करार :** गृहनिर्माण सहकारी संस्था खाजगी व्यावसायिकाकडून बांधकाम करणार असेल तर, योग्य व चांगली विश्वासार्हता असणाऱ्या बांधकाम व्यावसायिकाबरोबर कायद्यानुसार करार करतात.

५) **बांधकाम साहित्याची खरेदी :** बांधकामासाठी आवश्यक साहित्य उदा. सिमेंट, वाळू , विटा, लोखंड इ. च्या किंमती भरमसाठ असतात. सहकारी गृहनिर्माण संस्था बांधकाम साहित्याची घाऊक दराने खरेदी करतात. त्यामुळे सभासदांना

वाजवी किंमतीत बांधकाम साहित्य उपलब्ध होते. बांधकामासाठी खर्च कमी येतो. यामुळे सभासदांच्या खर्चात बचत होते.

६) **आवश्यक सुविधा मिळविणे :** सहकारी गृहनिर्माण संस्था सभासदांसाठी आवश्यक नागरी व सामुदायिक सुविधा पुरविण्यासाठी प्रयत्न करतात. उदा. वीजपुरवठा, पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था, अंतर्गत रस्ते इत्यादी.

७) **दुरुस्ती व देखभाल :** सहकारी गृहनिर्माण संस्था घरांची, इमारतीची दुरुस्ती व देखभाल करण्याचे महत्त्वाचे कार्य करतात. सामुदायिक सुविधांसाठी, दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी सभासदांकडून योग्य तो देखभाल खर्च घेतला जातो. दुरुस्ती व देखभालीची कामे एकत्रितपणे केली जात असल्याने खर्चात बचत होते.

८) **हिशेब लेखन :** गृहनिर्माण सहकारी संस्थेंच्या जमा खर्चाची नोंद नियमानुसार ठेवण्याचे कार्य संस्थेमार्फत केले जाते. सभासदांना त्याचा तपशील सादर करणे, आवश्यकतेनुसार हिशोबाचे अंकेक्षण (Audit) करून घेणे इ. कार्ये करावी लागतात.

९) **गरजू सभासदांना तयार घरे पुरविणे :** काही गृहनिर्माण सहकारी संस्थेमार्फत तयार असणारी घरे गरजू व्यक्तिंना पुरविण्याचे कार्यही केले जाते. ज्या व्यक्तिंना गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या घरबांधणी प्रक्रियेमध्ये वेळ देणे शक्य नसते. अशा व्यक्तिंची घराची गरज यामधून पूर्ण होते.

१०) **सभासदांना शिक्षण :** सहकारी गृहनिर्माण संस्था सभासदांना शिक्षण देण्याचे महत्वाचे कार्य करतात. सहकारी गृहनिर्माण संस्थांची कार्यपद्धती याबाबत असणारे कायदे व नियम, सहकारी जीवनपद्धती, पर्यावरण संवर्धन व खर्चातील काटकसरी बाबतचे व्यावहारिक शिक्षण सभासदांना मिळते.

**फरक – १) सहकारी पतपुरवठा संस्था व सहकारी गृहनिर्माण संस्था**

| अ.नं. | मुद्दे | सहकारी पतपुरवठा संस्था | सहकारी गृहनिर्माण संस्था |
|---|---|---|---|
| १) | अर्थ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तिंजवळील तारण स्वीकारून त्यांच्या सोयीस्कर अटींवर बँकिंग व्यवहार करणारी संस्था म्हणजे सहकारी पतपुरवठा संस्था होय. | राहण्यासाठीच्या घरांची गरज पूर्ण करणारी सहकारी तत्वावर स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय. |
| २) | स्थापना | प्रामुख्याने ग्रामीण भागात केली जाते. | प्रामुख्याने शहरी भागात केली जाते. |
| ३) | सभासदत्व | शेतकरी,शेतमजूर,लहान कारागीर यांना सभासदत्व दिले जाते. | अल्प व मध्यम उत्पन्न गटातील व्यक्तिंना सभासदत्व दिले जाते. |
| ४) | उद्देश | सभासदांना योग्य व्याजदराने कर्ज पुरवठा करणे. | सभासदांचा घरांचा प्रश्न सोडवणे. |
| ५) | कार्यक्षेत्र | ग्रामीण व शहरी भागापुरते असते. | शहरापुरते मर्यादित असते. |
| ६) | कार्य | सभासदांना शेती उत्पादनासाठी कर्ज पुरवठा करणे. | सभासदांना राहण्यासाठी घरे उपलब्ध करून देणे. |

फरक – २) सहकारी प्रक्रिया संस्था व सहकारी गृहनिर्माण संस्था

| अ.नं. | मुद्दे | सहकारी प्रक्रिया संस्था | सहकारी गृहनिर्माण संस्था |
|---|---|---|---|
| १ | अर्थ | शेतमालावर प्रक्रिया करणे हा ज्या संस्थेचा मुख्य उद्देश असतो. तिला प्रक्रिया सहकारी संस्था असे म्हणतात. | निवाऱ्यासाठी घरांची गरज पूर्ण करणारी सहकारी तत्वावर स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय. |
| २ | स्थापना | प्रामुख्याने ग्रामीण भागात केली जाते. | प्रामुख्याने शहरी भागात केली जाते. |
| ३ | सभासदत्व | संबधित शेतमाल उत्पादक शेतकऱ्यांना सभासदत्व दिले जाते. | अल्प व मध्यम उत्पन्न गटातील व्यक्तिंना सभासदत्व दिले जाते. |
| ४ | उद्देश | शेतमालावर प्रक्रिया करून योग्य किंमत मिळवून देणे. | सभासदांचा राहण्यासाठीच्या घरांचा प्रश्न सोडवणे. |
| ५ | कार्यक्षेत्र | प्रामुख्याने ग्रामीण भागात असते. | प्रामुख्याने शहरापुरते मर्यादित असते. |
| ६ | कार्य | शेतमालावर प्रक्रिया करणे व जोडव्यवसायाला चालना देणे. | सभासदांना राहण्यासाठी घरे उपलब्ध करून देणे. |



कृती–

१) **एखाद्या सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष किंवा सचिव यांच्या मुलाखतीच्या आधारे संस्थेच्या कार्याबाबत माहिती मिळवा.**

## ९.५ सारांश

निवाऱ्याची गरज असणाऱ्या व्यक्तींनी एकत्र येऊन घरांचे बांधकाम, दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी सहकार कायद्यानुसार स्थापन केलेली संस्था म्हणजेच सहकारी गृहनिर्माण संस्था होय.

"मर्यादित उत्पन्न असलेल्या व्यक्तींनी एकत्र येऊन आपल्या घराची गरज पूर्ण करण्यासाठी सहकारी तत्वानुसार केलेली संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय." महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० नुसार "आपल्या सभासदांना राहण्यासाठी घरे किवा सदनिका बांधून देणे,तसेच सभासदांना समान सुखसोयी आणि सेवा पुरविणे या उद्देशाने सहकारी तत्वावर स्थापन झालेली संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय."

- **सहकारी गृहनिर्माण संस्थेची वैशिष्टये**

१. ऐच्छिक संघटन
२. वाजवी किंमतीमध्ये घर बांधणी
३. भांडवल उभारणी
४. लोकशाही व्यवस्थापन
५. मध्यस्थांचे उच्चाटन

६. बांधकाम, दुरुस्ती व देखभाल खर्चात बचत
७. सभासदांच्या बचत सवयीमध्ये वाढ
८. समूह जीवनाचा आनंद
९. शहरी भागांचा विकास
१०. कर्ज पुरवठ्याची तरतूद

- **सहकारी गृहनिर्माण संस्थेची कार्ये**

१. गृहनिर्माण संस्थेसाठी जागा मिळविणे
२. संस्थेच्या नोंदणीसाठी आवश्यक ती पूर्तता करणे
३. बांधकाम परवानगी मिळविणे
४. बांधकाम व्यावसायिकांबरोबर करार
५. बांधकाम साहित्याची खरेदी
६. आवश्यक सुविधा मिळवणे
७. दुरुस्ती व देखभाल
८. हिशेब लेखन
९. गरजू सभासदांना तयार घरे पुरविणे
१०. सभासदांना शिक्षण

## ९.६ महत्त्वाच्या संज्ञा

१) **गृहनिर्माण विकास वित्तीय महामंडळ – (HDFC)** सभासदांना घर बांधणीसाठी दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करणारे महामंडळ.

२) **गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळ – (HUDCO)** नागरी भागातील सहकारी गृहनिर्माण प्रकल्पांना कर्जपुरवठा करते.

३) **भारतीय राष्ट्रीय सहकारी गृहनिर्माण महासंघ – (National Co-operative Housing Federation of India.)** ही राष्ट्रीय शिखर संस्था देशातील एकूण सहकारी गृहनिर्माण चळवळीला दिशा देण्याचे कार्य करते.

## ९.७ स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) सहकारी गृहनिर्माण संस्था ही घरांची गरज असणाऱ्या व्यक्तिंकडून स्थापन केलेली ----- संस्था आहे.

अ) ऐच्छिक ब) सक्तीची क) अनावश्यक

२) मर्यादित उत्पन्न असलेल्या व्यक्तिंना सहकारी तत्वावर योग्य किंमतीत घरे पुरविणारी संस्था म्हणजे ----- संस्था होय.

अ) सहकारी विपणन ब) शेती सहकारी क) सहकारी गृहनिर्माण

३) मानवाची ----- ही एक मूलभूत गरज आहे.
   अ) नावलौकिक   ब) करमणूक   क) निवारा

४) सहकारी गृहनिर्माण संस्था सभासदांना ----- मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देतात.
   अ) अल्प   ब) दीर्घ   क) मध्यम

## ब) योग्य जोड्या जुळवा

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| अ) पहिली गृहनिर्माण सहकारी संस्था | १) १९६९ |
| ब) राष्ट्रीय सहकारी गृहनिर्माण महासंघ स्थापना | २) गृहनिर्माण सहकारी संस्था |
| क) गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळ स्थापना | ३) १९६० |
| ड) निवाऱ्याची सोय | ४) बेंगलोर को-ऑप सोसायटी लिमिटेड |
| | ५) १९४७ |
| | ६) १९७० |
| | ७) रॉश्डेल इक्विटेबल पायोनिअर्स सोसायटी लिमिटेड |
| | ८) सहकारी विपणन संस्था |

## क) खालील विधानांसाठी एक शब्द/शब्द समूह लिहा.

१) अन्न, वस्त्र या बरोबरच मानवाची तिसरी मूलभूत गरज
२) सभासदांना वाजवी किंमतीत घर उपलब्ध करून देणारी सहकारी संस्था
३) सहकारी गृहनिर्माण संस्थांचे कामकाज ज्या तत्त्वानुसार चालते ते तत्त्व
४) निवाऱ्याची सोय उपलब्ध करून देणारी सहकारी संस्था

## ड) खालील विधाने चूक किंवा बरोबर ते लिहा.

१) सहकारी गृहनिर्माण संस्था सभासदांना अल्प मुदतीचा कर्जपुरवठा करतात.
२) सहकारी गृहनिर्माण संस्था ही एक ऐच्छिक संघटना आहे.
३) शहरी भागात सहकारी गृहनिर्माण संस्थेला फारसे महत्त्व नाही.
४) सहकारी गृहनिर्माण संस्थाचे कार्य हुकूमशाही तत्वानुसार चालते.

## इ) खालील विधाने पूर्ण करा.

१) सहकारी तत्त्वावर घरबांधणी करणारी संस्था म्हणजे ......... संस्था होय.
२) सहकारी गृहनिर्माण संस्थांमुळे सभासदांना ............ किंमतीत घरे उपलब्ध होतात.
३) सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सर्व निर्णय ................ पद्धतीने घेतले जातात.
४) गृहनिर्माण सहकारी संस्था प्रामुख्याने ......... भागात स्थापन केल्या जातात.
५) गृहनिर्माण सहकारी संस्था सभासदांना ............ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देतात.

### (फ) अचूक पर्याय निवडा.

| | |
|---|---|
| १) पहिली गृहनिर्माण सहकारी संस्था | |
| २) | राष्ट्रीय शिखर संस्था |
| ३) | घरबांधणीला कर्ज पुरवठा |
| ४) सहकारी गृहनिर्माण संस्था | |
| ५) | सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी |

जिल्हा उपनिबंधक, वाजवी किंमतीत घर, महाग घर, गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळ, सिडको, राष्ट्रीय सहकारी गृहनिर्माण महासंघ, बेंगलोर को. ऑप. सोसायटी लि.

### ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सहकारी गृहनिर्माण संस्था प्रामुख्याने कोणत्या भागात स्थापन होतात ?

२) सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापनेचा मुख्य हेतू कोणता ?

३) गृहनिर्माण सहकारी संस्था म्हणजे काय ?

४) सहकारी गृहनिर्माण संस्था कोणत्या सुविधा उपलब्ध करून देतात ?

### ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करुन वाक्य पुन्हा लिहा.

१) सहकारी गृहनिर्माण संस्था प्रामुख्याने खेड्यात स्थापन केल्या जातात.

२) जास्त उत्पन्न गटातील व्यक्तिंना सहकारी गृहनिर्माण संस्था गरजेच्या असतात.

३) सहकारी गृहनिर्माण संस्था सभासदांना अल्प मुदतीचा कर्जपुरवठा करतात.

४) सहकारी विपणन संस्था निवाऱ्याची गरज पूर्ण करतात.

५) भारतात पहिली गृहनिर्माण सहकारी संस्था रॉश्डेल इक्विटेबल पायोनिअर्स सोसायटी लिमिटेड या नावाने स्थापन झाली.

### ई) गटात न बसणारा शब्द शोधा.

१) अ) भारतीय आर्युविमा महामंडळ   ब) गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळ
क) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया   ड) गृहनिर्माण विकास वित्तीय महामंडळ

### प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.

१) सहकारी गृहनिर्माण संस्था

२) भारतीय राष्ट्रीय सहकारी गृहनिर्माण महासंघ

### प्र.३ स्वमत लिहा. / उपयोजनावर आधारित प्रश्न.

१) ''सहकारी गृहनिर्माण संस्था सर्वसामान्य व्यक्तिंच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत'' याबाबत आपले मत लिहा.

२) ''सहकारी गृहनिर्माण संस्थांमुळे मध्यमवर्गीय व्यक्तिंची स्वमालकीच्या निवाऱ्याची समस्या दूर झालेली आहे. याबाबत आपले मत व्यक्त करा.

### प्र.४ फरक स्पष्ट करा.

१) सहकारी पतपुरवठा संस्था आणि सहकारी गृहनिर्माण संस्था

२) सहकारी विपणन संस्था आणि सहकारी गृहनिर्माण संस्था

३) सहकारी गृहनिर्माण संस्था आणि सहकारी प्रक्रिया संस्था

४) सहकारी गृहनिर्माण संस्था आणि सेवा सहकारी संस्था

### प्र.५ टीपा लिहा.

१) सहकारी गृहनिर्माण संस्था

२) सहकारी गृहनिर्माण संस्थेची वैशिष्ट्ये

३) सहकारी गृहनिर्माण संस्थेची कार्ये

### प्र.६ कारणे लिहा.

१) सहकारी गृहनिर्माण संस्थांमुळे सामान्य व्यक्तिंना घर खरेदी करणे सुलभ झाले आहे.

२) शहरी भागात सहकारी गृहनिर्माण संस्थांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

३) गृहनिर्माण सहकारी संस्थांमुळे मध्यस्थांचे उच्चाटन होण्यास मदत होते.

४) गृहनिर्माण सहकारी संस्थेमुळे घराचे स्वप्न पूर्ण होते.

### प्र.७ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१) सहकारी गृहनिर्माण संस्थांची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) सहकारी गृहनिर्माण संस्थेची कार्ये लिहा.

### प्र.८ दीर्घोत्तरी प्रश्न.

१) सहकारी गृहनिर्माण संस्थेची व्याख्या सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) सहकारी गृहनिर्माण संस्थेचा अर्थ सांगून कार्ये सविस्तर लिहा.

◆◆◆